महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

## महा मेट्रो येथे ५डी-बीम तंत्रज्ञानाचा उपयोग

पुणे,२४ : पिंपरी चिंचवड ते स्वारगेट आणि वनाज ते रामवाडी असा मेट्रो रेल्वेचा मार्ग साकारला जात आहे. ११ हजार ४२० कोटी खर्च होणाऱ्या ३१.२५४ कि.मी.च्या या मार्गावर मेट्रो धावणार आहे. या कामावर देखरेख ठेवण्यासाठी महा मेट्रोने स्वीकारलेल्या ५डी-बीम तंत्रज्ञानानुसार प्रकल्पाचे काम आतापर्यंत २३.५ टक्के पूर्ण झाले असल्याचे दिसून येते. डिसेंबर २०१९ पर्यंत प्रायोरिटी सेक्शन मार्गावर म्हणजेच (पिंपरी-चिंचवड)येथे मेट्रो वाहतूक सुरु करण्याचा मानस महा मेट्रोने योजिला आहे.

पुण्यात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वेच्या संपूर्ण कामावर देखरेख ठेवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या ५डी-बीम तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. एकाच ठिकाणी प्रकल्पाचे सर्व अपडेट उपलब्ध व्हावे यासाठी स्वीकारण्यात आलेल्या या तंत्रज्ञानानुसार २३.५ टक्क्यावर आले असल्याचे आढळून येते.मेट्रोच्या मार्गावर सुरु असलेल्या विविध कामांचे डिझाईन या ठिकाणी अपलोड करण्यात आले आहेत. बिलांचा हिशोबही या बीम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ठेवण्यात येत आहे.

५डी-बीम ची वैशिष्ट्ये : महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात साकारला जात असलेल्या मेट्रो  रेल्वेच्या कामात कुठलीही चूक होऊ नये यासाठी विशेष तंत्रज्ञानाची मदत घेतल्या जात आहे. देशात पहिल्यांदाच ५डी-बीम तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खर्चापासून ते वेळेच्या नियोजनावरही लक्ष ठेवण्यात येणार आहे.   पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या सिव्हील कोर्ट  येथील कार्यालयात  ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. सुरुवातीला एखाद्या प्रकल्पासाठी कागदावर नोंदी घेतल्या जात होत्या. पारंपारिक पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या या कामांत अनेक चुका राहायच्या आणि यामुळे प्रकल्पाचे काम रेंगाळायचे. ५डी-बीममुळे संपूर्ण प्रकल्पांचे अपडेट एकाच ठिकाणी प्राप्त होत आहे. छोटी चूकही प्रकल्पासाठी महागात पडू शकते त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.